संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# सर्वाधिक रोजगार देणारे 'ड्राईव्ह इन इंडिया'

**नुकताच** औद्योगिक सुरक्षा दिवस पाळला गेला. राष्ट्रीय पातळीवर हा दिवस जाहीर झाला असला तरी त्याची किती गंभीरतेने दखल घेतली जाते हाही एक मोठा प्रश्नच आहे. उद्योगांमध्ये सुरक्षितता राहील, अपघात होऊ नयेत, अशा उद्देशाने हा दिवस पाळला जातो. यामागे मालक, कामगार आणि सरकार या तीनही ठिकाणी दक्षता जागरूकता राहावी असाच उद्देश असतो. परंतु प्रत्यक्ष मालक किंवा कंपनी व्यवस्थापनावरच या सुरक्षिततेची अधिक जबाबदारी येऊन पडते. अर्थात सुरक्षिततेच्या व्याख्येत खरे तर केवळ घात अपघात किंवा तांत्रिक बिघाड, असा मर्यादित अर्थ करून चालणार नाही औद्योगिक सुरक्षितता ही एक व्यापक संकल्पना झाली पाहिजे. त्यामध्ये मालक असो, कामगार असो,. या दोघांच्याही आर्थिक सुरक्षिततेचाही विचार झाला पाहिजे. म्हणजेच कंपनी आणि कंपनीत काम करणारा प्रत्येक घटक याच्या भवितव्याची सुरक्षितता त्यामध्ये अभिप्रेत असते. हीच संकल्पना अधिक विस्तारता येऊ शकते आणि उद्योग हा शब्ददेखील केवळ कारखाने फॅक्टरी यांच्यापुरता मर्यादित न ठेवता ज्या ज्या ठिकाणी उत्पादन, विक्री, खरेदी किंवा आर्थिक उत्पन्न याचाच संबंध येत असेल किंबहुना जिथे जिथे रोजगार व्यापार किंवा व्यवसायाचा संबंध येत असेल त्या सगळ्या गोष्टी उद्योग या शब्दांतर्गत घेतल्या गेल्या पाहिजेत. मग तो उद्योग भाजी विक्रेत्याचा असेल औद्योगिक कारखान्यांना वेगवेगळ्या वस्तूंचा पुरवठा करणारा असेल. हे सगळे घटक उद्योग या संकल्पनेशी जोडता येऊ शकतात. खरे तर या सगळ्या उद्योग क्षेत्राशी एक फार मोठा घटक कायमचा जोडलेला असतो. ज्याची सहसा कोणी फारशी दखल घेत नाही. त्याचे महत्त्व सगळ्यांना मान्य असते. परंतु त्याला उद्योगाचा दर्जा न दिल्यामुळे या घटकाकडे आतापर्यंत अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. देशभरातील विविध प्रकारच्या उद्योगांमधली उत्पादने किंवा कच्चा माल यांची ने आण करणारा ट्रक व्यवसाय हा मोठा उद्योग आहे हे अजूनही आपल्या देशात पाहिजे तितके मान्य झालेले नाही. संपूर्ण देशभरात लाखोंच्या संख्येने ट्रक्स आहेत. आणि हे ट्रक चालवणारे चालक मालक यांची संख्यासुध्दा काही कोटींच्या घरात जाऊ शकते. देशाच्या सगळ्या प्रमुख महामार्गांवरून लाखोच्या संख्येने मालवाहतूक करणाऱ्या या ट्रकचालक या घटकाच्या सुरक्षेविषयी जरी मुद्दा लक्षात घेतला तरी औद्योगिक सुरक्षितता याच्याशी या घटकाचाही किती जवळचा संबंध येऊ शकतो हे लक्षात येऊ शकते.

## ट्रकचालकांच्या समस्या

कोणत्याही महामार्गावर किंवा रस्त्यांवर विविध प्रकारची वाहतूक करणारा ट्रक व्यवसाय प्रचंड दुर्लक्षित आहे. सहज गंमतीने जरी त्या ट्रकवर लिहिलेली वाक्ये किंवा शेरोशायरी वाचली तरी त्यांच्यातील वेदना किंवा हा व्यवसाय करताना त्यांनी मानून घेतलेला आनंद सहजपणे लक्षात येतो. देशभरातल्या हजारो ट्रकच्या मागे बुरी नजरवाले तेरा मुह काला असे वाक्य हमखास लिहिलेले पाहायला मिळते. याचा अर्थ हजारो किलोमीटरच्या प्रवासामध्ये किती जणांच्या नजरा या ट्रकवर पडत असतील. आणि आपला हा जोखीमभरा प्रवास विना अपघात आणि सुरक्षित व्हावा, अशी त्या चालकाची इच्छा असते, आणि म्हणून आपल्या या व्यवसायाला किंवा रोजगाराला कोणाचीही दृष्ट लागू नये नजर लागू नये म्हणून अशा प्रकारची वाक्ये लिहिली जात असावीत. आज वस्तुस्थिती अशी आहे की देशाच्या उद्योग विकासामध्ये मोठे योगदान देणारा ट्रकचालकांचा व्यवसाय सरकारनेही नीट लक्षात घेतलेला नाही. मुळात ट्रक चालवणारा ड्रायव्हर हा अल्पशिक्षित असतो. व्यवसाय रोजगाराच्या मजबुरीमुळे तो सगळ्या प्रकारचा त्रास सहन करतो. वर्षातून किमान सहा ते आठ महिने बाहेर राहणे त्याला भाग पडते. परंतु त्याला सुरक्षा कवच देणारा आज एकही कायदा नाही. उलट त्याला छळणारे अनेक घटक पाहायला मिळतात. मग वेगवेगळ्या राज्यातील वाहतूक पोलीस, त्यांना द्यावे लागणारे हप्ते काही ठिकाणच्या गुंडप्रवृत्ती, टोलनाके, पेट्रोलपंप अशा अनेक ठिकाणी त्यांना अनेक गोष्टींशी सामना करावा लागतो. आठ तासापेक्षाही जास्त काम करण्याची त्यांच्यावर वेळ येते. आणि मग ट्रकखालीच असलेल्या सावलीत छोटीशी पथारी पसरून किंवा चालकाच्याच केबिनमध्ये पाय दुमडून तो आपली विश्रांतीची गरज भागवून घेतो. कामाचा हा ताण सहन होत नसल्यामुळे मग व्यसनाधीन होणारा ट्रकचालक आपल्या अनारोग्याचाही बळी ठरत राहतो. या सगळ्या ट्रक चालकांच्या सुरक्षिततेचा नीट विचार केला तर एका चांगल्या उद्योगाचा अधिक चांगला परिणाम होऊ शकतो.

## भटका नव्हे नीटनेटका

आज या ट्रकचालकांना मिळणाऱ्या वागणुकीमुळे किंवा त्यांना सोसाव्या लागणाऱ्या त्रासामुळे कौटुंबिक आणि सामाजिक समस्याही भेडसावत असतात. मग ड्रायव्हरला मुली न मिळण्यापासून ते कमी पगारामध्ये आयुष्य जगावे लागण्याचे संकट त्यांना पेलावे लागते. जर सरकारने मध्यस्थी करून ट्रक चालकांसाठी विशिष्ट योजना तयार केली त्यांच्यासाठी पगाराचे पॅकेज कामाच्या वेळा त्यांच्यासाठी महामार्गावर विश्रांतीची चांगली ठिकाणे आरोग्यविषयक सुविधा अशा काही गोष्टींचा जर विचार केला तर आणखी चांगली सुशिक्षित तरुणवर्गसुध्दा या व्यवसायात येऊ शकतो. भारतात दरवर्षी किमान २५ हजार चालकांची गरज भासत असते. त्याची पूर्तता होऊ शकत नाही. चालक किंवा ट्रकचालक या वर्गाला अपेक्षित असलेली प्रतिष्ठा जर मिळवून दिली तर हा व्यवसाय किंवा रोजगार स्वीकारणाऱ्यांची संख्या वाढू शकेल. काही तज्ज्ञांचे असे म्हणणे आहे की नरेंद्र मोदींच्या मेक इन इंडियापेक्षाही ड्राइव्ह इन इंडियामध्ये जास्त रोजगार क्षमता आहे. आणि ते खरेही आहे. औद्योगिक क्षेत्रात किंवा देशाच्या आर्थिक विकासातही लाखो ट्रकचालक आपले योगदान देत असतात. त्यांच्या या योगदानाची योग्य पध्दतीने दखल घेतली गेली पाहिजे. ट्रक व्यवसाय किंवा ट्रकचालक हा भटक्या स्वरुपाचा रोजगार आहे ही प्रतिमा पुसून टाकली पाहिजे. हा भटका उद्योग चांगल्या सोयीसवलती देऊन नीटनेटका करता येऊ शकतो. मात्र त्याकरिता सरकारला आपल्या फाटक्या कल्पनाशक्तीला ठिगळे द्यावे लागतील. रोजगार क्षमता असलेले हे क्षेत्र उद्योग म्हणून प्रतिष्ठित झाले पाहिजे.